# अश्विनी

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B 283

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अश्विनी : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण', प्लॉट नं. १७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- १९८६, दुसरी आवृत्ती- २००१,
तिसरी आवृत्ती- २००९, चौथी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ १८०/-

---

(या कादंबरीतील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत. वास्तवाशी मेळ जमल्यास तो केवळ योगायोग समजावा.)

मुलासारखे असणारे जावई श्री. अपरेश श. मायनेकर

आणि माझी कन्या सौ. सुप्रिया अ. मायनेकर

तसेच

माझी लाडकी नातवंडे चि. आर्यश व चि. सुयश

यांना शुभ आशीर्वादासह भेट...

# दोन शब्द

''अश्विनी'' ही माझी तिसरी कादंबरी आज तुम्हा रसिकांच्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे.

यापूर्वी प्रकाशित झालेल्या माझ्या दोन्ही कादंबऱ्या ''अबोल प्रीत बहरली'' आणि ''अजूनी तुझीच आहे'' तुम्हा रसिक वाचकांना आवडल्याची असंख्य पत्रे आली आहेत. आपण आपला अभिप्राय कळवून मला माझ्या साहित्यप्रवासात खरोखरी बहुमोल मदत केली आहे.

आपल्यासारख्या असंख्य रसिकांच्या शुभेच्छा मिळाल्या. थोरामोठ्यांचे आशीर्वाद लाभले. त्या सर्वांची मी मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या यापूर्वीच्या कादंबऱ्यांचे आपण ज्या रसिकतेने स्वागत केले आहे त्याप्रमाणेच ''अश्विनी''चेही स्वागत कराल, ही अपेक्षा आहे.

आपण आपला अभिप्राय जरूर कळवावा. वाचकांच्या प्रतिक्रियेवरच कादंबरीचे यशापयश अवलंबून असते, असं आपलं माझं मत आहे.

**सौ. शोभा सतीश राऊत**

# १

''आ...आई गं ऽऽ आ...आई...''

अविनाश मोठ्याने ओरडला. त्याला अतिशय वेदना होत होत्या. त्याचा हा विव्हळणारा आवाज ऐकून त्याच्या हाताला चावा घेत असलेल्या अश्विनीने एकदम त्याच हात सोडला. आता कुठे तिच्या लक्षात आले, रागाच्या भरात आपण अविनाशला खूप जोराने चावलो आहोत. ती भेदरली, घाबरली. आता हा अविनाश काय करणार आपल्याला? पण अविनाश वेदनेमुळे एवढा व्याकूळ झाला होता की त्याच्या काहीच लक्षात आले नाही. तो हात धरून रडत होता आणि भांबावलेली छोटी अश्विनी त्याच्याकडे पाहातच राहिली.

गॅलरीत खुर्ची टाकून वाचत बसलेल्या पप्पासाहेबांच्या कानावर अविनाशचे रडणे गेले. त्यांना अविनाशचा भारी राग आला. निवांतपणे वाचूनही होत नाही मुलांमुळे. वैतागलेले पप्पासाहेब स्वत: खाली आले. ते मनातच वटवटले,

''एकदा त्या पोरट्याला सांगायलाच पाहिजे, इथे यायचे असेल तर शांत खेळत जा. नाहीतर अजिबात येऊ नकोस. फुकट त्रास...''

ते खाली आले. अविनाशकडे रागाने पाहू लागले. अविनाश हात धरून रडत होता. पप्पासाहेबांना समजलं, हा काही उगीचच खेळता खेळता ओरडला नाही तर...! नक्कीच त्याच्या हाताला काहीतरी लागलेले दिसते आहे. जवळ जाऊन त्यांनी त्याचा हात हातात घेत विचारले, ''काय रे काय झालं? रक्तही आलंय.'' त्यांनी निरखून पाहिले. ''दाताच्या खुणा दिसताहेत, म्हणजे कोणी चावले की काय?''

अविनाशने मोठ्या प्रयासाने रडू आवरले. पप्पासाहेबांचा दराराच तसा होता. पप्पासाहेबांचे लक्ष शेजारी उभ्या असलेल्या अश्विनीकडे गेले. तिचा घाबरलेला चेहरा पाहून पप्पासाहेबांनी ओळखले, नक्कीच ही चावली असणार.

''आशू, तू चावलीस या अविला?'' अश्विनीने मानेनेच होकार दिला. पप्पासाहेबांना हे आवडण्यासारखे नव्हतेच.

फाड्... अश्विनीचा डावा गाल रंगला. तिला ती जोरदार थप्पड सहन झाली नाही.

''पप्पाऽऽ...!''

तिच्या तोंडून शब्द बाहेर पडले.

''चूप! हे एवढं..असं चावायचं असतं? आता तू काही लहान नाहीस चावायला. पुन्हा कोणाला चावलीस तर बघ! कधी जाणार तुझी ही वाईट सवय?''

''पप्पासाहेब, अहो कशाला मारलेत आशूराणीला? आमच्या या गधड्यानेच तिची काही खोडी काढली असेल. तिला काय समजते. लहानच आहे. चावली असेल!''

अविनाशकडे पाहात ते पुढे म्हणाले, ''अव्या, चल घरी पळ.''

तात्यांचे पुढे काही ऐकायला न थांबता अविनाशने सरळ घरचा रस्ता धरला. तात्यांनी अश्विनीला उचलून घेतले आणि ते तिची समजूत काढू लागले.

''आशूराणी, रडायचे नाही हं आता. घरी गेल्यानंतर अविला खूप मारतो मी.''

''तात्या, अविनेच आधी माझे केस ओढले, म्हणून मी चावले.''

''अस्सं! मला वाटलंच होतं तू काही उगीचच चावणार नाहीस. अगं, ती बघ तुझी लाडकी हिरा मांजरी. काय गं, मोती कुठे दिसत नाही.''

''अय्या, तात्या तुम्हाला एक गंमत सांगायचीच लाईली. ती हिला मांजली, मोती, अवि आणि मी आमचा फोतो काढला काल.''

''खर्रच? वा! वा!''

तात्यांनी माहिती असलेलीच बातमी नव्याने ऐकतोय असे दाखविले.

अश्विनीचे रडू कुठल्या कुठे पळाले. तात्यांनी आपली बाजू घेतली याचाच तिला भारी आनंद झाला.

''तात्या, पप्पा खूप रागावलेत माझ्यावर मी चावले म्हणून.''

''आशूराणी, असे चावायचे नसते. पप्पासाहेबांना ते आवडले नाही. हे बघ, आता जा तू. मी सांगतो त्यांना आशूवर रागवायचे नाही म्हणून.''

अश्विनी भारी आनंदली. तात्या तिला फार आवडायचे. नेहमी ते तिला छान छान गोष्टी सांगायचे.

तात्या पप्पासाहेबांकडे ड्रायव्हर म्हणून कामाला होते.

त्या रात्री पप्पासाहेब कितीतरी वेळ अश्विनीच्या गालावर हात फिरवीत बसले होते. किती जोराने मारले आपण आशूला! अगदी कळवळली ती. पाच वर्षांत त्यांनी तिला प्रथमच मारले होते आणि त्यामुळे ते घायाळ झाले होते.

अश्विनी! त्यांची एकुलती एक कन्या! त्यांच्या सुनंदाची निशाणी! 'सुनंदा, चुकले माझे! आज मी आपल्या आशूला मारले. रागावू नकोस गं! तुला वचन दिलंय तिचा चांगला सांभाळ करीन म्हणून. पण नंदा....नंदा, तू का गेलीस अशी पुढे... हा असा अर्धामुर्धा संसार सोडून? मला असे अर्ध्यावर सोडून..? तुझ्या या गोजिऱ्या मुलीला पोरके करून...का..का.. गेलीस तू?' पप्पासाहेबांचे मन सुनंदाच्या, त्यांच्या पत्नीच्या आठवणीने व्याकूळ झाले. पप्पासाहेबांना त्यांची नंदा डोळ्यांपुढे दिसू लागली. सुनंदा, एक हसतमुख व्यक्तिमत्त्व!

०००

नरेनला सर्व काही आठवू लागले. नंदा आणि त्याची झालेली पहिली भेट...

नरेन उच्च शिक्षण घेऊन परदेशातून परतला होता. आपण होऊन त्याला चांगली नोकरी चालून आली. या दोन वर्षांत त्याने तेथे आपला उत्तम जम बसविला होता. नरेनला त्याच्या पंचविसाव्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वडिलांनी सुंदर कार घेऊन दिली होती.

पावसाळ्याचे दिवस होते. नुकताच पाऊस पडून गेला होता. रस्त्याच्या मध्ये जागोजाग पाणी साचले होते. मुळात रस्ता अरुंद. नरेन आपल्याच मूडमध्ये कार चालवीत होता. वळण घेऊन गाडी थोडी पुढे गेली आणि रस्त्यावर साचलेल्या पाण्याचे एकदम फवारे उडाले. रस्त्याच्या कडेने जाणाऱ्या तरुणीच्या अंगावर ते पाणी उडाले. तिची साडी त्यामुळे खराब झाली होती. नरेनला आपली चूक लक्षात आली. एवढ्या स्पीडमध्ये आपण गाडी चालवायला नको होती. आता आपल्या

या चुकीचा पूर्ण मोबदला इथे मिळणार. वर झणझणीत शब्दांनी, चांगलीच कानउघडणी होणार. आणि प्रथम सॉरी म्हणावे. त्याने गाडी थांबवली पण घडले निराळेच. त्या तरुणीने क्षणभर त्याच्याकडे रोखून पाहिजे. दोन्ही खांद्यावर असलेला पदर सारखा करीत ती पुढे चालू लागली. नरेनला नवल वाटले. तो त्या जाणाऱ्या तरुणीकडे पाहातच राहिला.

'अरे, ही काहीही न बोलता कशी चालू लागली? थँक गॉड! त्या जळजळीत शब्दांची बरसात झाली नाही माझ्यावर.' नरेनने गाडी स्टार्ट केली आणि त्याने पाहिले. ती तरुणी ज्या घरात गेली ते ते घर त्याचा शाळेतील मित्र सुशांतचे होते. ही कोण असेल सुशांतची? पत्नी? पण त्याचे लग्न झालेले काही आपल्या कानावर नाही. केव्हातरी भेटतो...पण एकटाच असतो. नाहीतर कोणीतरी मित्र सोबतीला. काही कळत नाही. कोणाला तरी विचारावेच..त्या अबोल तरुणीने त्याला चांगलेच वेड लावले.

सुनंदा घरात येताच-समोर बसलेल्या सुशांतचे तिच्याकडे लक्ष गेले आणि तो चटकन उठत म्हणाला,

''नंदा, हा काय अवतार झालाय तुझा? कुठे आपटी खाल्लीस? एऽऽ कुठे पाहात चालली होतीस?'' त्याचे हे प्रश्न ऐकून सुनंदाला हसू आले. ''हं! म्हणे कुठे पाहात चालली होतीस?''

''सुशांत, आज तुझ्याप्रमाणे मी रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या मुलींची मुखकमले पाहात होते. कोणता थोबडा चांगला दिसतोय. त्याचाच हा प्रसाद-'' तिने हसून उत्तर दिले.

''नंदा, अगं हळू बोल. किती जोराने बोलतेस, आई आहे घरात. ऐकले तर काठी घेऊन लागेल माझ्या मागे. पण काय गं, दिसली का एखादी छान... सुंदरशी...म्हणजे आपलं..''

नंदाला हसू आवरेना. ती त्याला चिडवीत म्हणाली, ''सुशांत तुझे बॅड लक. तुला शोभेल अशी मुलगी काही मला दिसली नाही. हां, एक मुलगा मात्र बरा वाटला. ए, तू मुलगी असतास ना, तर जमवून टाकलं असतं.''

''जाऊ दे नंदा, माझ्यासाठी एवढी कष्टी होऊ नकोस. एक गोष्ट तू विसरलीस. अगं, माझे बॅड लक ते तुझे गुड लक होऊ शकते...''